**प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले यांच्यामार्फत उलटतपास सुरु**

**१०.** हे खरे आहे की, वाहनांची बनावट कागदपत्रे तयार करुन ती वाहने मी विकतो म्हणून माझ्यावर किनगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून त्याचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. हे खरे की, वादीसह मी प्रतिवादी मंचक, संजय शिवपुजे, लक्ष्मणे येमले, नंदकुमार लोंढे, राम शिंदे यांच्याविरुध्द फौजदारी खटला दाखल केला होता. हे खरे की, त्या प्रकरणी माझी साक्ष झाली आहे.

**११.** मला या दाव्याबद्दल माहिती आहे. लक्ष्मण चाटे याने माझ्याकडून रुपये सात लाख ऊसणे घेतले होते. त्यांच्याकडे मी रक्कम परत मागितल्यावर त्यांना दोन लाख रुपये कमी पडत होते म्हणून त्यांनी शिवपुजे व मंचक बोंडगे यांच्याकडे दरसाल १२ रुपये शेकडा व्याजाने दोन लाखांची मागणी केली. त्यांनी सुरक्षेपोटी प्लॉटची मागणी केली अशा स्वरुपाचा दावा आहे. पैसे मागितल्याबद्दल संजय शिवपुजे यांचे नाव दाव्यात किंवा शपथपत्रात नाही हे खरे आहे. वादी ही माझ्या भावकीतील आहे, हे खरे आहे. दि.०७/०४/२०१५ व ०८/०४/२०१५ रोजी मंचक बोंडगे यांनी वादीला धनादेश वाद मिळकतीसाठी दिले याची मला माहिती नाही. हे खरे की, वादी, प्रतिवादी क्र.१ आणि संजय शिवपुजे यांच्यासमक्ष हा सौदा झाला. हे खरे नाही की, वादी व लक्ष्मण चाटे यांच्या सांगण्यावरुन मी खोटया मजकूराचे शपथपत्र दिले. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**प्रतिवादी क्र. १ साठी उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.२ तर्फे श्री.उप्पे वकीलामार्फत उलटतपास सुरु.**

**१२.** मी १२ वी पर्यंत शिकलो आहे. हे खरे की, वादीने प्रतिवादी क्र.१ याला करुन दिलेले खरेदीपत्र आणि वादीने संजय शिवपुजेला करुन दिलेले खरेदीपत्र

यावर माझी साक्षीदार म्हणून सही नाही. वादीने प्रतिवादी क्र.१ ला करुन दिलेले खरेदीपत्र मी वाचून पाहिले नाही. त्या खरेदीपत्रातील मजकुर मला माहितीचा नाही हे खरे आहे. हे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र.१ ला ते खरेदीपत्र का करुन दिले हे मला माहिती नाही. या खरेदीपत्रामध्ये सुरक्षितेपोटी खरेदीपत्र करुन दिले असा उल्लेख नाही हे मला माहित नाही. या खरेदीपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.१ याची नोंद महसुल दप्तरी झाली हे खरे आहे. साक्षीला येताना मी दाव्याची पुर्ण माहिती घेतली आहे. या प्रकरणी वादीचा मुलगा लक्ष्मण याची साक्ष झाली आहे यास माझे सांगणे की, तशी ती झाली असावी. लक्ष्मण चाटेचे सरतपासाचे शपथपत्र मी वाचून पाहिलेले नाही. हे खरे नाही की, सरतपास परिच्छेद क्र.४ मधील शेवटचे वाक्य मी खोटे लिहिले आहे. मला साक्षी समन्स नाही. हे खरे की, लक्ष्मण चाटे यांच्या सांगण्यावरुन मी साक्षीला आलो. वादीने प्रतिवादी क्र.१ याला करुन दिलेल्या खरेदीपत्राचा हा दावा आहे, हे खरे आहे. संजय शिवपुजेच्या आणि वादीच्या व्यवहाराचा उल्लेख मी सरतपास परिच्छेद क्र.८ मध्ये का केला हे मला माहिती नाही. दाव्यातील मजकूर लक्ष्मण चाटे यांच्या सांगण्यावरुन त्यांच्या वकिलांनी लिहिला याबद्दल मला माहिती नाही.

**१३.** प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेले खरेदीपत्र मी बघितलेले नाही. हे खरे की, त्या खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणून माझी सही नाही. हे खरे की, त्या खरेदीपत्रातील मजकुर मला माहिती नाही. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला कोणत्या कारणाने जमीन विकली हे मला माहिती नाही. सदर दाव्यात प्रतिवादीविरुध्द मनाई आदेश पारीत झाला आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. हे खरे की, माझ्या सरतपास परिच्छेद क्र.९ मधील मजकुर हा वकिलांच्या सांगण्यावरुन लिहिला आहे.

**१४.** हे खरे नाही की, मी वादीला वेळोवेळी हातउसणी रक्कम देत होतो असे मी खोटे सांगतो. त्या संदर्भाने मी लेखी पुरावा दिला नाही व देवू शकत नाही यास माझे सांगणे मला त्याबद्दल माहिती नाही. हे खरे नाही की, सुरक्षेपोटी खरेदीपत्र

केल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे की, आजही दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या नावे अभिलेखांना नोंद आहे. प्रतिवादी क्र.२ हा मागील ३० वर्षापासून मुंबईत राहतो याबद्दल मला माहिती नाही. आजही वाद मिळकतीत वादीचा ताबा आहे असे मी खोटे सांगतो, हे खरे नाही. हे खरे नाही की, वादी माझ्या भावकीतील असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक:१६/१२/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**